स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/०८ दि. १३/०४/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'दि. १४ एप्रिल, २०२६ रोजी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांची जयंती साजरी करण्याबाबत...

संदर्भ : १.मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे दि. १३ एप्रिल २०२६ रोजीचे पत्र
२.मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचालनालय, युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांचा दि. १३ एप्रिल २०२६ रोजीचा मेल

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती १४ एप्रिल २०२६ रोजी साजरी करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देऊन सामाजिक न्याय, समता व बंधुता यांचा पाया मजबूत केला आहे. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन सामाजिक जाणीव व बौद्धिक मूल्यांची जडणघडण होणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये सर्व रासेयो स्वयंसेवकांच्या सहभागातून निंबध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यानमाला व विचार प्रबोधन कार्यक्रम, संविधान सामाजिक न्याय विषयक चर्चासत्र अशाविविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. या उपक्रमांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक समता व जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण, संघटन आणि समाजसेवा या विचारांनी प्रेरित होऊन १३५ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर **स्पर्धेचा विषय 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य'** हा असून **दिनांक १४ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीमध्ये** निबंध PDF (हस्तलिखित किंवा टंकलिखित) स्वरूपात सोबत जोडलेल्या परिपत्रकामधील लिंकवर अपलोड करणे अनिवार्य आहे. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे.

सदर उपक्रमाचे My Bharat पोर्टलवर Event Create करून माहिती अपलोड करण्यात यावी. सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर सदर उपक्रमाचा अहवाल, फोटो, विद्यार्थी संख्या BOD लॉगीनमध्ये Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती–२०२६'** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र. २६/रासेयो कक्ष, दिनांक: १३ एप्रिल २०२६

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
**रासेयो संलग्नित,**
**सर्व विद्यापीठे/संचालनालये, महाराष्ट्र राज्य**

**विषय:- दिनांक १४ एप्रिल, २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्याबाबत....**

**संदर्भ:**-मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दि.१० एप्रिल, २०२६.

उपरोक्त संदर्भाधिन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

वरील संदर्भाधिन विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, दिनांक १४ एप्रिल, २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती सर्व विद्यापीठे/संचालनालये अंतर्गत महाविद्यालयांत उत्साहात साजरी करण्यात यावी.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून सामाजिक न्याय, समता व मानवाधिकारांचा दृढ पाया रचला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण, संघटन आणि समाजसेवा या विचारांनी प्रेरित होऊन, त्यांच्या १३५ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या निबंध स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, समता व बंधुता यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे.

**३.** त्यानुषंगाने आपल्या विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये आपल्या स्तरावरुन या स्पर्धेबाबत व्यापक जनजागृती करावी. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी / विद्यार्थीनींना सहभागासाठी प्रोत्साहित करावे, शैक्षणिक संस्था व प्रशासन यांच्याशी समन्वय साधणे, तसेच स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आपल्या स्तरावरुन योग्य नियोजन करण्यात यावे. या उपक्रमामुळे युवकांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची सवय, सामाजिक भान व नेतृत्वगुण विकसित होण्यास निश्चितच मदत होईल.

**४.** सबब, सदर उपक्रमात महाविद्यालयांतील रासेयो स्वयंसेवक तसेच इतर विद्यार्थी सहभागी झाल्याबाबतची सांख्यिकीय माहिती/अहवाल राज्य संपर्क अधिकारी, रासेसो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१ यांना दिनांक २१ एप्रिल, २०२६ पर्यंत सादर करण्यात यावा.

**(डॉ.मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी, विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) रासेयो क्षेत्रिय संचालक, क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५) निवडनस्ती- रासेयो कक्ष.

जा.क्र.मंत्री कौ उद्या ,रोज.,नावि.,/टिप्पणी/ 186/2026 /२० दि.


**मंत्री**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*www.maharashtra.gov.in*


दिनांक : 10 APR 2026

**विषय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन – संबंधित संस्थामध्ये सक्रिय सहभाग व जनजागृती बाबत.**

मा. महोदय / महोदया,

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, समता व बंधुता यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून सामाजिक न्याय, समता व मानवाधिकारांचा दृढ पाया रचला. शिक्षण, संघटन आणि समाजसेवा या त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण ही स्पर्धा आयोजित केली आहे.

आपल्या विभागामार्फत राज्यातील सर्व महाविद्यालयामध्ये या स्पर्धेबाबत व्यापक जनजागृती करून सहभागासाठी प्रोत्साहित करणे, शैक्षणिक संस्था व प्रशासन यांच्याशी समन्वय साधणे, तसेच स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे ही विनंती आहे. या उपक्रमामुळे युवकांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची सवय, सामाजिक भान व नेतृत्वगुण विकसित होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आहे.

आपल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

संबंधित स्पर्धेच्या नियम व अटींची माहिती या पत्रासोबत जोडली आहे.

**आपला विश्वासू,**

मंगल प्रभात लोढा

**(मंगल प्रभात लोढा)**

**प्रति,**

**मा. राज्य समन्वयक,**

**राष्ट्रीय सेवा योजना,**

**महाराष्ट्र राज्य.**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६ नियमावली

**विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य**

**स्पर्धेचे गट:**

- गट १ – ITI / डिप्लोमा / बायफोकल / MCVC विद्यार्थी (शब्दमर्यादा: ५०० ते ८०० शब्द)
- गट २ – पुरुष / महिला खुला गट (शब्दमर्यादा: ८०० ते १२०० शब्द)

📅 **कालावधी: दिनांक १४ ते २० एप्रिल २०२६**

📄 निबंध सादरीकरण: निबंध PDF (हस्तलिखित किंवा टंकलिखित) स्वरूपात सोबत दिलेल्या लिंक वर अपलोड करणे आवश्यक आहे.

https://forms.gle/RcFPhcUgY८X४P२NT८

🏆 **पारितोषिके: दोन्ही गटातून**

🥇 प्रथम – ₹ ३१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

🥈 द्वितीय – ₹ २१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

🥉 तृतीय – ₹ ११,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

निबंध मराठी भाषेत लिहिणे अनिवार्य असावा आहे.निबंध मूळ (Original) असावा, कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर शिष्ट आणि सुसंस्कृत असावा.

निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपात स्वीकारला जाईल; मात्र अंतिम सादरीकरण PDF स्वरूपातच करणे आवश्यक आहे. निबंध टाईप करून किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करून दिलेल्या लिंकवर अपलोड करावा.

स्पर्धकांनी खालील माहिती आवश्य भरावी: पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक, ITI/शाळा/महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता.

**सर्व सहभागी स्पर्धकांना डिजिटल प्रमाणपत्र दिले जाईल.**

**स्पर्धेबद्दल अधिक महितीसाठी 9152230193 या व्हाट्सपअप नंबर वरती संपर्क करावा.**